|| अंतरी पेटवू ज्ञानज्योत ||

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

# Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University Jalgaon

'A' Grade NAAC Re-Accredited

## संलग्नता विभाग

जाक्रं.कबचौउमवि/५/स्वायत्त दर्जा/नियमावली/७५/२०२५. दि. २४.३.२०२५.

**<u>अत्यंत महत्त्वाचे परिपत्रक</u>**

**(स्वायत्त दर्जा प्राप्त महाविद्यालये व परिसंस्था)**

**प्रति,**

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्नीत असलेल्या
स्वायत्त महाविद्यालयांचे मा.प्राचार्य आणि मान्यताप्राप्त संस्थाचे मा. संचालक यांना..

**विषय**:- विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे दि. ३ एप्रिल २०२३ ची अधिसूचना (Notification) च्या अनुषंगाने स्वायत्त महाविद्यालये/परिसंस्थांबाबत मार्गदर्शक नियमावलीबाबत.

**संदर्भ**:-१.मा. विद्या परिषद ठराव क्रं. वि.प.ए-२०६/२०२४, दि. २४.१२.२०२४.
२.मा. व्यवस्थापन परिषद ठराव क्रं.व्य.प.ए-१३/२०२५, दि.२५.२.२०२५.

महोदय/महोदया,

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे दि. ३ एप्रिल २०२३ ची अधिसूचना (Notification) च्या अनुषंगाने स्वायत्त महाविद्यालये/परिसंस्थाबाबत मार्गदर्शक नियमावली तयार करण्यासाठी समिती नियूक्त करण्यात आली होती. सदर समितीने स्वायत्त महाविद्यालयांबाबत नियमावली तयार केलेली असून त्यास मा. विद्या परिषदेने संदर्भिय क्रं. १ व मा. व्यवस्थापन परिषदेने संदर्भिय क्रं. २ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे. त्यानुसार स्वायत्त महाविद्यालये/परिसंस्थांबाबत खालीलप्रमाणे नियमावली तयार करण्यात आली असून सदर नियमावली शैक्षणिक वर्ष २०२५-२६ पासून लागू करण्यात येत आहे.

विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे दि. ३ एप्रिल २०२३ च्या अधिसूचनेत (Notification) नमूद केल्याप्रमाणे जी महाविद्यालये पात्रता पूर्ण करीत असतील ती महाविद्यालये स्वायत्त दर्जा प्राप्त करणेसाठी प्रस्ताव सादर करू शकतील.

०१) <u>प्रवेश व पात्रता</u> :- स्वायत्त महाविद्यालयांकडे विद्यार्थ्यांची पात्रता त्यांच्या स्तरावर करण्याचा अधिकार देण्यात आलेला असून सदर विद्यार्थ्यांची स्वायत्त महाविद्यालयाने केलेली पात्रता आकस्मितपणे तपासणी करण्याचे अधिकार विद्यापीटास राहतील. पात्रतेच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे शुल्क स्वायत्त महाविद्यालय विद्यापीटास अदा करणार नाहीत.

०२) विद्यापीठाकडून आयोजित करण्यात येणाऱ्या कार्यक्रमांमध्ये स्वायत्त महाविद्यालयांचे विद्यार्थी सहभागी होत असल्यामुळे प्रो-रेटा शुल्क, विद्यार्थ्यांचा विमा (Insurance) याबाबत विद्यार्थी महाविद्यालयात प्रवेशित होण्याच्या वेळीच अवगत करण्यात यावे म्हणजे त्यांच्याकडून आवश्यक ते शुल्क प्रवेशाच्या वेळी घेण्यात येईल. तसेच पदवी प्रमाणपत्रासाठी आकारण्यात येणारे शुल्क रु. १०००/- ऐवजी रु. ६००/- घेण्यात यावे व उर्वरित रक्कम रु. ४००/- दरवर्षी रु. १५०/- प्रति विद्यार्थी असे समान रकमेत आकारण्यात यावे व दरवर्षी विद्यार्थ्यांना आकरण्यात येणारी रक्कम रु. १५०/- यासाठी अंकेक्षणाच्या दृष्टीने वेगळे शिर्षक (Head) देण्यात यावे (शैक्षणिक वर्ष 2025-26 साठी FY-150, SY-150, TY-100 या प्रमाणे प्रती वर्ष रक्कम आकारणी करावी)

०३) विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दि. ०३ एप्रिल २०२३ रोजीच्या मार्गदर्शक सूचनेनुसार स्वायत्त महाविद्यालय/परिसंस्था यांना विस्तारांचे प्रस्ताव (नवीन अभ्यासक्रम, विषय, तुकडी, विद्यार्थी संख्या वाढ इ.) सादर करतेवेळी संलग्नता शुल्क आकारण्यात येणार नाही. मात्र व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना AICTE, Pharmacy Council of India New Delhi, Bar Council of India यांना प्रस्ताव सादर करण्याकरीता विद्यापीठाचे ना हरकत प्रमाणपत्र (NOC) देणे आवश्यक असते. सदर NOC देण्याकरीता रु. २०००/- प्रति विषय याप्रमाणे शुल्क घेण्यात येईल. मात्र ना हरकत प्रमाणपत्र देणेकरीता महाविद्यालय/परिसंस्था येथे पडताळणीकरीता समिती पाठविण्यात येणार नाही. तसेच नवीन विस्तारांसाठी शिखर संस्थेने (Apex Body) मान्यता दिल्यानंतर शासन निर्णयाची प्रतिक्षा न करता संलग्नता पत्र देणेबाबतची कार्यवाही करण्यात येईल. मात्र सदर अभ्यासक्रमासाठी दिलेले संलग्नता पत्र हे शासन निर्णयाच्या अधिन राहून देण्यात येईल.

०४) विद्यापीठाशी संलग्नीत महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी स्वायत्तता मिळण्यासाठी प्रस्ताव सादर केल्यास प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचेकडे अग्रेषित करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याच्या वेळेस महाविद्यालयास/परिसंस्थेस प्रथम स्वायत्त दर्जा देण्यासाठी रु. ५०,०००/- शुल्क आकारण्यात येईल. तसेच स्वायत्तता नुतनीकरणासाठी रु. २०,०००/- शुल्क महाविद्यालयाने भरणे बंधनकारक आहे.

०५) अध्यादेश १८१ अंतर्गत अभ्यासक्रम स्वायत्त महाविद्यालयांनी सुरु केल्यास त्याबाबत विद्यापीठास अवगत करण्याची गरज नाही. तसेच जे अभ्यासक्रम सुरु आहेत त्या अभ्यासक्रमांची विद्यापीठाची मान्यता संपुष्टात आल्यानंतर विद्यापीठाकडून संलग्नीकरण करण्याची आवश्यकता नाही.

०६) स्वायत्त महाविद्यालयांच्या बाबतीत महाविद्यालयाने नॅक करणे सक्तीचे आहे. मात्र नॅक कालावधी संपुष्टात आलेला असेल व त्या दरम्यान नॅक संदर्भात महाविद्यालय कार्यवाही करीत नसेल तर अशावेळी नॅकअभावी विद्यार्थी प्रवेशा संदर्भात अडचण निर्माण झाल्यास याबाबत योग्य तो निर्णय घेण्याचा आधिकार विद्यापीटाचा राहील.

०७) College will be eligible to participate or apply for VCRMS, Seminar & Conference grants,, RGSTC, Yuvati Sabha of various University fundig programme every year except Earn and Learn & EWS students scheme.

०८) स्वायत्त महाविद्यालयांमध्ये/परिसंस्थांमध्ये ४१५(१) नुसार शिक्षकांची नियुक्त करतांना अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयांनी/परिसंस्थांनी विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार कार्यवाही करावी व त्यास विद्यापीठाची अंतिम मान्यता घेणे बंधनकारक आहे.

०९) स्वायत्त महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या संशोधन केंद्रांवर Pre-PhD Viva, Final Viva आयोजित करता येईल (ऑनलाईन/ऑफलाईन). तसेच वरील कामाकाजासाठी विद्यापीठाने नियुक्त केलेले अध्यक्ष, अंतर्गत व बहिस्थ परीक्षक यांना दिले जाणारे मानधन प्रवास व दैनिक भत्त्यांची देयके महाविद्यालयांने / परिसंस्थेने संशोधन विभागास सादर करावी व सदरची देयके ही विद्यापीठाच्या प्रचलित नियमानुसार अदा करण्यात यावीत. तसेच स्वायत्त महाविद्यालयांच्या/परिसंस्थांच्या संशोधन केंद्रात विद्यार्थी प्रवेशित करावयाचे असल्यास त्यावेळी विद्यापीठाची PET परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यास प्रवेश देता येतील.

१०) जोपर्यत स्वायत्त महाविद्यालयाचा स्वायत्त दर्जा अस्तित्वात आहे तोपर्यत संशोधन केंद्रास (Research Center) ला मान्यता यथास्थिती राहील. तसेच स्वायत्ततेचे नुतनीकरण करतांना संशोधन केंद्राचे नुतनीकरणे आवश्यक राहील.

कृपया सदर परिपत्रक महाविद्यालय/परिसंस्थेच्या संबंधितास निदर्शनास आणून दयावे व नियमावलीप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी ही विनंती.

(डॉ.विनोद पी. पाटील)
(कुलसचिव)

प्रत:- १. मा. कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि जळगांव.
२.मा. प्र-कुलगुरू कार्यालय, कबचौउमवि जळगांव.
३.मा. कुलसचिव कार्यालय, कबचौउमवि जळगांव.

प्रत माहिती व पुढील कार्यवाहीस्तव:-

१. मा. संचालक परीक्षा व मुल्यमापन मंडळ, कबचौउमवि जळगांव.
२. मा. वित्त व लेखा अधिकारी, वित्त विभाग,कबचौउमवि जळगांव.
३. मा. संचालक, विद्यार्थी विकास विभाग, कबचौउमवि जळगांव.
४. मा.संचालक, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कबचौउमवि जळगांव.
५. मा.क्रिडा संचालक, क्रिडा विभाग, कबचौउमवि जळगांव.
६. मा.उपकुलसचिव,व्याख्याता मान्यता व मागासवर्ग कक्ष विभाग, कबचौउमवि जळगांव.
७. सहा. कुलसचिव, संशोधन विभाग, कबचौउमवि जळगांव.
८. सहा. कुलसचिव, विकास विभाग, कबचौउमवि जळगांव.
९. सहा. कुलसचिव, प्रवेश पात्रता विभाग, कबचौउमवि जळगांव.
१०. मा.समन्वयक, ई-सुविधा केंद्र, कबचौउमवि जळगांव.